मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १६२६/२००८
अपील क्रमांक १६२७/२००८
अपील क्रमांक १६२८/२००८
अपील क्रमांक १६२९/२००८
अपील क्रमांक १५४८/२००८
अपील क्रमांक १५४९/२००८
अपील क्रमांक १५५०/२००८

१) श्री मनोहर मारोतराव धकाते
रा.अंचलेश्वर वार्ड, गोंडपूरा,
चंद्रपूर, ता.जि.चंद्रपूर-४४२४०२ **अपीलकर्ता**

<u>वि रु ध्द</u>

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती-जात प्रमाणपत्र तपासणी समिती,
आदिवासी भवन, गिरीपेठ, नागपूर.

३) जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
अनुसूचित जमाती-जात प्रमाणपत्र तपासणी समिती,
आदिवासी भवन, गिरीपेठ, नागपूर. **उत्तरवादी**

(आदेश पारित दिनांक १३.६.२००८)

<u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये ३ द्वितीय अपील, दिनांक १२.११.२००७ रोजी १ द्वितीय अपील, दिनांक ११.९.२००७ रोजी १ द्वितीय अपील व दिनांक २४.९.२००७ रोजी २ द्वितीय अपीले असे एकुण ७ द्वितीय अपीले दाखल केली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

अपील क्रमांक १६२६/२००७ :- मध्ये अपीलकर्ता यांनी सन १९९५ ते २००२ या कालावधीतील एकुण ९ उमेदवारांच्या संदर्भात वैधता प्रमाणपत्र व इतर कागदपत्राची प्रमाणित प्रत. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

अपील क्रमांक १६२६/२००७, १६२७/२००७ :- मध्ये दिनांक ३०.८.२००७ रोजी केलेल्या माहितीच्या अर्जामध्ये एकुण ४७ व्यक्तीच्या माहितीची मागणी केली आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दिनांक २६.९.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांनी वरील संदर्भीय एकुण ५ अर्ज प्राप्त असून सदर ५ अर्जानुसार आपण एकुण ४७ नांवे नमूद व्यक्तीशः माहितीची मागणी केली आहे. सदर एकुण ४७ व्यक्तींच्या संबेधात माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने कलम ११ (१) नुसार कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे. तसेच सदर व्यक्तीच्या पत्रव्यवहाराचा पत्ता किंवा पत्रव्यवहाराकरीता आवश्यक माहिती आपण अर्जात नमूद केलेली नसल्याने कलम ११(१) खाली कर्यवाही करता आली नाही असे कळवून अर्ज फेटाळण्यात आलेला आहे, असे दिसून येते.

अपील क्रमांक १६२८/२००७ व १६२९/२००७ :- मध्ये पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००७ रोजी एकुण २१ उमेदवारांची सन १९९५-२००२ या कालावधीतील वैधता प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रतीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.९.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २२.८.२००७ च्या एकुण ४ अर्जाच्या संदर्भामध्ये आपण एकुण (३९) व्यक्तीच्या संबंधीत माहिती मागितलेली आहे. तथापि, ३९ व्यक्तीची त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे कलम ११(१) खाली कार्यवाही करण्याकरीता माहिती आवश्यक पत्रव्यवहाराचा पत्ता दिलेला नाही. वरील कारणामुळे कलम ११(१) खाली कार्यवाही करता आली नाही. सबब, वरील कारणास्तव आपला अर्ज फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००७ रोजी वरील पाचही अर्जाच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा निर्णय देण्यात

आलेला दिसून येत नाही. व म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय कां देण्यात आला नाही याबध्दल विचारले असता अपीलकर्ता यांचे शेकडे अर्ज व शेकडो प्रथम अपीले असल्यामुळे व प्रथम अपीलात कोणत्याही प्रकारचा नवीन निर्णय देता येत नसल्यामुळे सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा केला.

अपीलकर्ता यांच्या वरील नमूद केलेल्या अर्जामधील मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता एकुण ४७ उमेदवारांच्या संदर्भात जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही १९९५ ते २००२ या कालावधीतील दिसून येते. व ती देणे हे जन माहिती अधिकारी यांना शक्य नाही असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे अशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन व ती माहिती मोघम मागितलेली आहे त्यामुळे अपीलकर्ता यांना जे उत्तर दिनांक २६.९.२००६ रोजी देण्यात आले आहे ते योग्य आहे.

अपील क्रमांक १५४८/२००७ :- मध्ये अपीलकर्ता यांनी सन २००० ते २००७ या कालावधीतील श्री नरेंद्र सि. कुळमेथे यांना अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी दिलेल्या वैधता प्रमाणपत्राबाबत सर्व कागदपत्रांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ७.७.२००७ रोजी अपीलकर्ता यांचे दिनांक १४.६.२००७ चे एकुण ८ अर्ज व दिनांक २२.६.२००७ चे एकुण ५ अर्जाकरीता, "वरील संदर्भीय अर्जानुसार आपण मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ११ (१) अन्वये कार्यवाही सुरु आहे. त्रयस्थ पक्षाकडून परवानगी प्राप्त झाल्यास माहिती पुरविण्यात येईल. परवानगी प्राप्त न झाल्यास वरील सर्व अर्ज निकाली काढण्यात आले आहे असे समजण्यात यावे. करीता कळविण्यात येत आहे, असे कळविल्याचे दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २३.१०.२००७ रोजी एकुण १० अर्जातील प्रथम अपीलाचा निर्णय हा कळविण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला दिसून येतो. तसेच शासकिय

माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचेकडे मोजक्या प्रकरणाची माहिती न मागता वारंवार मोठया प्रमाणावर शेकडो प्रकरणात माहिती मागण्याचा ओघ सतत सुरु आहे. त्यामुळे अधिनियमाचे कलम ८ (ञ) अन्वये मागितलेली माहिती ही सार्वजनिक कामकाजाशी संबंधीत नाही. त्यामुळे आपण मागितलेली माहिती कलम ८ (ञ) तसेच कलम ७ (९) अन्वये फेटाळण्यात येत आहे असे कळविण्यात आलेले दिसते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातील माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी उमेदवारांची फक्त नांवे दिलेली आहे व माहितीचा कालावधी सन २००० ते २००७ असा दिलेला असल्यामुळे सात वर्षाच्या कागदपत्रामधून सदरची माहिती शोधून त्यानंतर कलम ११ प्रमाणे कार्यवाही करणे हे अश्यक असल्यामुळे सदरचे दिलेले उत्तर हे योग्य आहे. व तेच प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा योग्य आहे.

अपील क्रमांक १५४९/२००७ :- मध्ये दिनांक २१.७.२००७ रोजी सन २००१ ते २००२ या कालावधीतील श्री विनायक सांबा तुमडाम यांना दिलेल्या वैधता प्रमाणपत्राच्या संदर्भात माहिती मागितल्याचे दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १९.१०.२००७ रोजी श्री विनायक सांबा तुमडाम यांची माहिती ही त्रयस्थ पक्षाच्या संबंधात असल्याने कलम ११ (१) अन्वये आपण व्यक्तीच्या पत्रव्यवहाराचा पत्ता न दिल्याने त्रयस्थ पक्षाचे म्हणणे मागण्याची कार्यवाही करता येत नाही. आपला अर्ज कलम ११(१) अन्वये फेटाळण्यात येत आहे, असे कळविण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे दिनांक २१.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक १६.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांचे एकुण पाच अपीलाचे संदर्भात निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे श्री विनायक सांबा तुमडाम यांचे संदर्भात सुध्दा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेले दिसून येतो. व सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अर्जातील मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी मोघम अशी माहिती मागितलेली दिसून येते व त्यामुळे दिनांक १९.१०.२००७ रोजी जे उत्तर दिले आहे ते योग्य असून प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य आहे.

अपील क्रमांक १५५०/२००७ :- मध्ये अपीलकर्ता यांनी कु. अर्पना विनायक तुमडाम यांचे सन २००० ते २००७ या कालावधीतील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांनी दिलेल्या वैधता प्रमाणपत्राच्या संबंधातील सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती मागितलेल्या दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांना महिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने कलम ११(१) अन्वये कार्यवाही करीता आपण ज्या व्यक्तीची महिती मागितली त्या व्यक्त्िच्या पत्रव्यवहाराचा पत्ता अर्जात दिलेला नसल्याने कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षाशी पत्रव्यवहार होऊ शकला नाही. सबब वरील कारणास्तव अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे माहिती अधिकारी यांनी अपीलीकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.१०.२००७ रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी यांचा निर्णय काम करण्यात आला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या दिनांक २०.६.२००७ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरच्या माहितीचे वर्णन मोघम स्वरुपाचे असल्यामुळे जन माहित अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय सुध्दा योग्य आहे.

अपीलकर्ता यांच्या वरील सर्व अपीलांच्या सुनावणीमध्ये उत्तरवादी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

"अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १३.७.२००७, १७.०७.२००७ दि. १३.०७.२००७ दि.१७.०७.२००७ चे प्रथम अपील अर्जावर श्री मनोहर मारोतराव धकाते यांना असे कळविले की, आपणास आतापर्यंत सहा प्रकरणामध्ये माहिती दिलेली असून सदर माहिती त्यांनी दिनांक ३०.८.२००७ व दिनांक २९.७.२००७ अन्वये प्राप्त केलेली आहे तरी देखील आपणशासकीय अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचेकडे मोजक्या प्रकरणाची माहिती न मागता वारंवार मोठया प्रमाणावर शेकडे प्रकरणाची माहिती मागण्याचा ओघ सतत सुरु आहे. त्यामुळे अधिनियमाच्या कलम ८ (त्र)(जे) नुसार मागितलेली माहिती ही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हित संबंधाशी नाही. त्यामुळे आपण मागितलेली माहिती कलम ८ (त्र)(जे) तसेच कलम ७ (९) अन्वये फेटाळण्यात येत आहे.

अपीलकर्ता श्री मनोहर मारोतराव धकाते यांनी जनमाहिती अधिकारी/अपीलीय अधिकारी यांना पाठविलेले अर्ज पाहता निव्वळ मोघम स्वरुपात शेकडो नावे कळवून त्यांची वैयक्तिक माहिती मागीतलेली आहे. तसेच माहिती व्यक्तीशः हवी आहे असे मुळ अर्जामध्ये नमूद केलेले असतांना सदर प्रकरणाची माहिती त्यांनी व्यक्तीशः घेऊन जाणे नियमानुसार आवश्यक होते. तथापी त्यांनी श्री लीलाधर पी.डफाडे यांचे नांव अधिकारपत्र देऊन त्यांच्या करवी माहिती प्राप्त केली आहे.

जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेकडे मोजक्या प्रकरणाची माहिती न मागता वारंवार मोठया प्रमाणावर शेकडो त्रयस्थ पक्षाशी संबंधीत माहिती मागण्याचा ओघ सतत सुरु आहे. व सदरची माहिती मागतांना संबंधित त्रयस्थ व्यक्तींचे फक्त नांव कळवून त्यांच्या प्रकरणातील माहिती मागणी केली जाते. त्यामुळे हजारोंच्या संख्येत असलेल्या प्रकरणमधून सदरच्या व्यक्ती मािहिती शोधने शक्य होत नाही व जन अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची हकनाक पिळवणूक होते. सदरची माहिती अधिनियमाच्या कलम ८ (त्र) नुसार ही सार्वजनिक कामाशी किंवा हितसंबंधाशी नाही. त्यामुळे त्यांनी मागीतलेली शेकडो प्रकरणाची माहिती मागण्यात त्यांची मानसिकता स्पष्ट दिसून येते.

श्री रवी सयाम या अर्जदाराने श्री प्रशांत मनोहर धकाते, सौ कलावती धकाते व श्री मनोहर धकाते (अपीलकर्ते) यांचे संदर्भात जन माहिती अधिकारी यांना त्यांची माहिती

मागितलेली असता जन माहिती अधिकारी यांनी धकाते कुटूंबियांना (अपीलकर्त्यांने) त्यांची व्यक्तीगत माहिती संबंधितास द्यावी काय या संदर्भात त्यांना कलम ११(१) अन्वये विचारणा केली असता अपीलकर्त्यांनी आपल्या कार्यालयात असलेली त्यांची वैयक्तिक माहिती तसेच दावा पडताळणीसाठी सादर केलेली माहिती तसेच दस्ताऐवज/प्रमाणपत्रे देण्यात येऊ नये आणि जर कार्यालयाने त्यांच्या संबंधातील कोणतेही दस्तऐवज/प्रमाणपत्र दिले आणि त्यामुळे त्यांच्या जिवितास किंवा शारीरीक सुरक्षिततेस धोका झाला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील अशी धमकी जन माहिती अधिकारी यांना अपिलकर्त्यांनी दिली. तसेच त्यांनी व्यक्तीगत व त्यांचे कुटूंबाचे हितार्थ त्यांची माहिती देण्यात येऊ नये अशी न्यायाची भुमिका स्विकारली परंतु इतरांच्या बाबतीत तसा विचार केलेला नाही. उलट जनमाहिती अधिकारी यांना एक प्रकारची धमकी दिलेली आहे. ही गंभीर स्वरुपाची बाब आहे. तसेच या समितीचे सदस्य श्री सुरेन्द्र वामणराव सावरकर, संशोधन अधिकारी यांनी सुध्दा वारंवार धमक्या येऊन शेवटी त्यांचेवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. ज्यामुळे ते अद्यापही या धक्यातून सावरलेले नाही.

अपीलकर्ता श्री मनोहर मारोतराव धकाते हे सन २००६ मध्ये नगरपरिषद, चंद्रपूर येथून नगरपरिषद सदस्य या पदावर निवडणुक लढले त्यांचे विरुध्द निवडणुकीमध्ये श्री दिनेश बाबुराव सेडमाके हे होते. श्री दिनेश बाबुराव सेडमाके हे अनुसूचित जमातीचे आरक्षित पदावर निवडून आले. श्री दिनेश बाबुराव सेडमाके हे अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र धारक आहे. श्री मनोहर मारोतराव धकाते हे निवडणुकीत पराभुत झाल्याने त्यांनी श्री दिनेश बाबुराव सेडमाके यांचे वैधता प्रमाणपत्रा संदर्भातील हरकतीचा कुद्या । न्यायालयात उपस्थित करुन मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्रं.३५४५/२००७ अन्वये याचिका दाखल केली.तत्पुर्वी श्री मनोहर मारोतराव धकाते यांचे पुत्र श्री प्रशांत मनोहर धकाते यांनी माहिती अधिकार अंतर्गत श्री दिनेश बाबुराव सेडमाके यांचे जातीविषयक कागदपत्रे मागितले रिट याचिकाची प्रत प्राप्त होताच श्री दिनेश बाबुराव सेडमाके हे नागपूर समिती कार्यालयात आले

त्यांनी कार्यालयास असे सांगितले की, मी गरीब ॲटोचालक असून माझ्या गरीब परिस्थितीमुळे मला सदर न्यायालयीन प्रकरणी नागपूरला येण्या जाण्याचा खर्च तसेच सदर प्रकरणी स्वतःचा वकील लावण्यास्तव येणारा खर्च माझे परिस्थितीला झेपणारा नाही. न्यायालयानिमित्त चंद्रपूरहून नागपूर येथे येणे-जाणे करतांना मला सदर दिवशी ॲटो बंद ठेवलयामुळे रोजी सुध्दा मिळणार नाही. सदर प्रकरणावरुन स्पष्ट होते की, अपीलकर्ता यांनी वैयक्तिक स्वार्थापोटी सदर प्रकरण उपस्थित केले आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, अपीलकर्त्याचा मुळ हेतू स्वहितार्थ असून जनहितार्थ नाही हे स्पष्ट होते. अपीलकर्त्याने स्वहितार्थ शेकडो प्रकरणी माहिती मागितल्याने इतर दुर्गम भागात राहाणा-या शेकडो आदिवासीच्या बाबतीत अशी गंभीर परिस्थिती येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उक्त नमूद केलेली चार अपीले क्रं.१५४९ तसेच दिनांक २२.५.२००८तसेच दिनांक २३.५.२००८, दि.४.०६.२००८ व ६.०६.०८ रोजी आपणाकडे सुनावणीनंतर निर्णय झालेली अपीले क्रमांक १५३२/२००६ ते १५४०/२००७ तसेच १५७९ ते १५८२, १५९२ ते १५९५ तसेच १५४१ ते १५४२ एकोणवीस प्रकरणे याबाबत अपिलकर्त्यांच्या मागणीमध्ये बरीच साम्यता आहे. तेव्हा सदर प्रकरणी आपण दिलेला निर्णय हा अपील क्रं. १५४९/०७ मध्ये ही कायम करणे विषयी आपणास नम्र विनंती करण्यात येत आहे

श्री मनोहर मारोतराव धकाते तसेच श्री प्रशांत मनोहर धकाते यांचा जातीचा दावा तपासण्यास्तव प्रकरण समितीकडे सादर केलेले आहे. सदर प्रकरणी समितीचा निर्णय अद्याप झालेला नाही. तेव्हा इतरांनी स्वतःचे संदर्भात माहिती मागितली असता ती नाकारली जाते. तेव्हा वारंवार हेतुपुरस्पर अर्ज पाठवून शासकीय माहिती अधिकारी व अपीलकर्त्यास माहिती दिली नाही म्हणून वेठीस धरणे ही बाब स्पष्ट होते.

मा. उच्च न्यायालय रिट याचीका क्रं.३३४३/१९९० कु. नंदा शंखपाले व रिटयाचिका क्रं. १२७९/२००३ मधील दिनांक २९.७.२००३ चे कोर्ट निर्देशानुसार समितीला मासिक ६०० प्रकरणे निकाली काढण्याचा लक्षांक दिलेला आहे. समिती किमान वार्षिक ६ हजर ते ७ हजार

दाव्यावरती निर्णय घेत असते त्यानुसार सदर माहिती ही कलम ७(९) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर लागणार असल्याने त्यांनी मागितलेली माहिती शोधून त्यांना देणे हे कार्यालयाला शक्य होत नाही.

शासकिय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी वर्ग २ यांचे पद दिनांक ६.११.२००६ पासून ते दिनांक १५.४.२००७ पर्यंत रिक्त असून तसेच संशोधन अधिकारी यांची पदोन्नती झाल्यामुळे सद्यस्थितील अद्यापर्यंत पद रिक्त आहे. उपसंचालक तथा सदस्य सचिव यांचे पद रिक्त आहे. व सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार उपसंचालक तथा सदस्य सचिव, गडचिरोली यांचेकडे देण्यात आलेला आहे. संशोधन अधिकारी (गडचिरोली, नागपूर) वरिष्ठ संशोधन अधिकारी यांचे पद रिक्त असून तया पदाचा अतिरिक्त कार्यभार देखील कनिष्ठ प्रशासकिय अधिकारी यांचेकडे देण्यात आलेला आहे. तेव्हा अशा परिस्थ्िंतीत समितीकडे जमातीचा दावा तपासण्यास्तव दररोज प्राप्त होणारी प्रकरणे तपासणी तसेच मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे सुध्दा विहित कालावधीत प्रकरणे निकाली काढावी लागतात.

तसेच समितीच्या निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या शेकडो प्रकरणात समितीचे पॅनल ॲडव्होकेट व सरकारी वकील यांना रेकार्ड पुरविणे तसेच सदर प्रकरणामध्ये उत्तरे सादर करणे व न्यायालयाचे सुनावणीच्या वेळी न्यायालयात उपस्थित राहणे या व्यतिरिक्त अनुसूचित जमातीविषयक संशोधनात्मक माहिती गोळा करणेकरीता गावोगावी जाऊन तेथील आदिवासी घरकुलांना भेटी देणे इत्यादीमुळे इत्यादि कामे पार पाडावी लागतात तेंव्हा अपिलकर्त्याने पाठविलेल्या अर्जाच्या प्रतीवरुन सदर खुलाश्यास पुष्टी मिळु शकेल. तेव्हा सदर खुलासा मान्य व्हावा ही विनंती. "

वरील अपील प्रमाणे अपीलकर्ता यांच्या यापूर्वी सुध्दा अपील क्रमांक १५३२ ते १५४०, अपील क्रमांक १५७९ ते १५८२, अपील क्रमांक १५९२ ते १५९५ आणि अपील क्रमांक १५४१ व १५४२ अशा एकुण १९ अपीलांचा निर्णय आतापर्यंत दिलेला असून सदरची अपीले ही खारीज करण्यात आलेली आहेत. आयोगाच्या कार्यालयातील माहिती प्रमाणे अपीलकर्ता यांचे अजूनही

बरीच अपीले ही सुनावणीसाठी प्रलंबीत आहेत. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता हे त्यांच्या स्वतःच्या कुटूंबातील तीन उमेदवारांच्या जात पडताळणीसाठी दावे प्रलंबीत असल्यामुळे तसेच ते श्री शेडमाके यांचे विरुध्द निवडणुक हरल्यामुळे मा. उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असल्यामुळे अपीलकर्ता हे जात पडताळणी समितीवर मानसिक दबाव आणून त्यांच्या बाजूने निर्णय यावा या उद्येशाने समितीच्या अधिका-यांना वेठीस धरुन अशा प्रकारचे शेकडो उमेदवारांच्या संदर्भात माहिती मागत आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. तसेच स्वतःची व कुटूंबियांच्या जातपडताळणी दाव्यातील कागदपत्रे श्री रवी सयाम यांना देऊ नयेत ते मात्र इतरांची कागदपत्रे मागतात हे त्यांच्या नैतिकतेच्या दृष्टीने सुध्दा योग्य नाही. व हा निश्चितच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदींचा गैरवापर आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे सार्वजनिक व्यापक हितासाठी माहिती मागण्याचा उद्येश असावा लागतो. परंतु अपीलकर्ता हे स्वतःच्या हिताकरीता अधिनियमांच्या तरतूदींचा गैरवापर करीत आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांची वरील सर्व अपीले हे खारीज करण्यास पात्र आहेत.

आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १६२६/२००७, अपील क्रमांक १६२७/२००७, अपील क्रमांक १६२८/२००७, अपील क्रमांक १६२९/२००७ व अपील क्रमांक १५४८/२००७, अपील क्रमांक १५४९/२००७ अपील क्रमांक १५५०/२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

दिनांक १३.६.२००८

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर